21/08/2024, 22:10 16503411870255501505741465512472 - Dr Vinod Raut.jpg

20

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 271(CCLXXI) B
ISSN : 2278-9308
Fabruary, 2021

# बाबा आमटेंच्या 'ज्वाला आणि फुले' मधील जीवन दर्शन

डॉ. वैजयंती पेशवे
कमला नेहरू महाविद्यालय नागपूर

पांगळ्याला सामर्थ्य देण्यासाठी ज्यांनी आपल्या आयुष्याचे समर्पण केले, नवा माणुस घडविण्यासाठी, जगातल्या अमंगलतेचा नाश करण्यासाठी, करूणा आणि आत्मविश्वास यांना सोबत घेवून जगलेल्या बाबा आमटेंचे "ज्वाला आणि फुले" हे चिंतन म्हणजे त्यांच्या मनातल्या वादळाने घेतलेलं शब्दरूप होय, एका कर्मयोग्याने हे खडे बोल आहेत, लोक विलक्षण आत्म्याचा ऊर्जस्वल शब्दविलास आहे. यातील शब्दन् शब्द त्यांच्या अश्रुंनी भिजलेला, आणि रक्ताने रंगलेल्या आणि घामाने फुललेला आहे. बाबांचे व्यक्तिमत्व आणि कार्य एवढे मोठे आहे की, त्यांच्यातील कवित्वाला आपोआपच दुय्यमत्व प्राप्त होते. "ज्वाला आणि फुले" हे चिंतन कुठल्याही विशिष्ट वाङमय प्रकारात मोडणारे नाही. कविता, निबंध आणि आत्मवृत्त यांचे अद्वितीय मिश्रण यात आढळते त्यामुळे आपोआपच त्यात कल्पकता, प्रेरकता आणि प्रामाणिकता यांचा सुरेख संगम पहायला मिळतो.

बाबा आमटे म्हणतात, "तुमच्या कामातून तुमचं संपूर्ण आयुष्य दृग्गोचर होत असतं" म्हणूनच "ज्वाला आणि फुले" या चिंतनाचा आस्वाद घ्यायचा असेल तर बाबांचे जीवन, त्यांनी घेतलेले उत्कट अनुभव, जीवनातील विसंगतीला तडा देवून सुसंगती निर्माण करण्याची त्यांची ऊर्जा माहित असायला हवी. "पांगळ्यांच्या सोबतीला येवू दे बलदंड बाहू" असे विशाल स्वप्न पाहिले, हजारो पांगळ्यांना आत्मनिर्भर करणाऱ्या बाबांचे जीवन म्हणजे एक महाकाव्य आहे. हे कुरूप जग सुंदर कसे होईल हा एकच ध्यास त्यांच्या आत्म्याने घेतला होता. उकिरड्यावर पडलेल्या महारोग्याला पाहून महारोग्यांसाठी आपले जीवन समर्पित बाबांच्या 'कोवळ्या' मनातून पेटलेल्या ज्वाला म्हणजेच "ज्वाला आणि फुले" हे चिंतन होय.

"ज्वाला आणि फुले" यात धर्म, क्रांती, साम्यवाद भांडवलशाही या सोबतच कुटुंब नियोजन निवृत्ती, दानधर्म यासारख्या दैनंदिन जीवनाशी निगडीत गोष्टीपर्यंत सर्व विषयांचा समावेश आहे. 'ज्वाला आणि फुले' समजुन घेतांना बाबांच्या कार्याप्रमाणेच त्यांचे जीवन विशयक तत्वज्ञान माहित असणे गरजेचे आहे. त्याचा आधी थोडक्यात आढावा घेवू. बाबांच्या मते माणसाचे मातीशी दृढ असे नाते आहे. रात्रदिवस राबणारा श्रमिकच माणूसपणाचे सोने निर्माण करू शकतो. परिश्रमात मातीचे सोने करण्याची ताकद आहे. बौध्दीक श्रम आणि शारिरीक श्रम यांना बाबा समान दर्जा देतात. विज्ञान आणि आध्यात्म यांच्या जोडीला सत्य आणि शिव आले तर आनंदाला परिसीमा उरणार नाही. मनुष्य कितीही मोठा असो; संत, सम्राट, महाकवी, परमवीर असला तरी त्याला जगाकडे पाठ फिरवून सुखाने जगता येणार नाही. पोट भरले असेल तरच मस्तक ताठ रहाते. शोषण करणारे समाजाला काहीही देवू शकत नाही. वैफल्याला वाट शोधता येत नाही. ज्याची स्पर्धा स्वत:शीच आहे, त्याला कोणीही जिंकू शकत नाही. ही बाबांची जीवन विषयक सुत्रे आहेत.



https://drive.google.com/file/d/1u6vv2fhxY1JKLwj9cUTkjTrcXHeXLrUZ/view 1/1